स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२२–२३/७६८ दि. १६/०९/२०२२

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
फक्त नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : मतदार ओळखपत्रास आधारकार्ड जोडणी जनजागृती उपक्रम बैठकीबाबत

महोदय,

मा. उपजिल्हाधिकारी, नाशिक यांच्या पत्रानुसार मा. भारत निवडणूक आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र शासन, विधी व न्याय मंत्रालय यांचेद्वारे निवडणूक कायदा (सुधारणा) अधिनियम, २०२१ अन्वये लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५० मध्ये सुधारणा केल्या आहेत. यामध्ये कलम २३ नुसार मतदार यादीतील तपशीलाशी जोडण्याकरिता आणि प्रमाणीकरणासाठी मतदारांकडून ऐच्छिकपणे आधारची माहिती संग्रहित करणेबाबतच्या सुधारणा अतंर्भुत केल्या आहेत.

त्यानुसार रासेयो स्वयंसेवकांमार्फत मतदार ओळख पत्रास आधार कार्ड जोडणी करण्याच्या कार्यक्रमासंदर्भात जनजागृती करणे व सदर कार्यक्रमाची व्यापक प्रमाणात प्रसिध्दी करणे या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनाकरिता दि. २० सप्टेंबर २०२२ रोजी, दुपारी ११.३० वाजता कर्मवीर शांताराम बापु कोंडाजी वावरे आर्टस, सायन्स आणि कॉमर्स कॉलेज, उत्तम नगर, सिडको, नाशिक येथे मतदार ओळखपत्रास आधार कार्ड जोडणी प्रक्रिया याबाबत नाशिक जिल्ह्यातील सर्व कार्यक्रम अधिकारी व रासेयो विद्यार्थी प्रतिनिधी यांच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरी दि. २० सप्टेंबर २०२२ रोजी, आपल्या महाविद्यालयातील रासेयो कार्यक्रम अधिकारी व रासेयो विद्यार्थी प्रतिनिधी यांना सदर उपक्रम बैठकीकरिता उपस्थित होण्याकरिता सूचित करावे व या उपक्रमाकरिता महाविद्यालयामार्फत नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयाला योग्य ते सहकार्य करण्यात यावे. कळावे, ही विनंती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत : मा. उपजिल्हाधिकारी, नाशिक यांचे पत्र

*Greater participation for a stronger democracy*

# जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, नाशिक यांचे कार्यालय

दूरध्वनी क्रमांक : 0253-2310523 फॅक्स : 0253-2578652 Email ID : dydeonashik@gmail.com

क्र. निवडणूक/कावि/सं.क्र.2/463/2022
नाशिक दिनांक :- 13 /09/2022.

प्रति,
श्री. डॉ. प्रभाकर देसाई,
संचालक, राष्ट्रीय सेवा योजना (NSS),
सावित्रीबाई फुले विद्यापिठ,
गणेश खिंड, पुणे

**विषय :- मतदार ओळखपत्रास आधारकार्ड जोडणी करणेबाबत जनजागृती उपक्रम राबविणेबाबत**
**संदर्भ :- मा. अवर सचिव तथा उप मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयीन पत्र क्र.संकीर्ण-2022/प्र.क्र. 507/22/33 दि. 21 जुलै, 2022.**

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मा. भारत निवडणूक आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र शासन, विधी व न्याय मंत्रालय यांचेव्दारा निवडणूक कायदा (सुधारणा) अधिनियम, 2021 अन्वये लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, 1950 मध्ये सुधारणा केल्या आहेत. यामध्ये, कलम 23 नुसार मतदार याद्यातील तपशीलाशी जोडण्याकरीता आणि प्रमाणीकरणासाठी मतदारांकडून ऐच्छिकपणे आधारची माहिती संग्रहित करणेबाबतच्या सुधारणा अंतर्भुत केल्या आहेत.

त्यानुषंगाने, राष्ट्रीय सेवा योजना (NSS) अंतर्गत आपले अधिनस्त असणाऱ्या नाशिक जिल्ह्यातील विविध शैक्षणिक संस्थामधील महाविद्यालयीन नवमतदार विद्यार्थी यांचे मार्फत मतदार ओळख पत्रास आधार कार्ड जोडणी करण्याच्या कार्यक्रमासंदर्भात जनजागृती करणे व सदर कार्यक्रमाची व्यापक प्रमाणात प्रसिध्दी करणे याबाबत करावयाच्या उपक्रमाचे यशस्वी आयोजनाकरीता **मंगळवार दिनांक 20.09.2022 रोजी ठिक दुपारी 11.30 वा. कर्मविर शांताराम बापु कोंडाजी वावरे आर्टस, सायन्स आणि कॉमर्स, कॉलेज उत्तम नगर, सिडको नाशिक येथे मतदार ओळखपत्रास आधार कार्ड जोडणी प्रक्रिया बाबत सर्व कार्यक्रम अधिकारी व विद्यार्थी प्रतिनिधी राष्ट्रीय सेवा योजना (NSS) यांची कार्यशाळा/प्रशिक्षण वर्ग आयोजन करण्यात आले आहे.** तरी सदर प्रशिक्षण वर्गास आपले स्तरावरुन परवानगी देण्यात येऊन सदर जनजागृती उपक्रमास सहकार्य करावे, ही विनंती.

( स्वाती थविल )
उपजिल्हाधिकारी तथा
उपजिल्हा निवडणुक अधिकारी, नाशिक.